महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
पश्चिम विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा, रोग अन्वेषण विभाग,
ब्रेमेनचौक, औंध, पुणे ६७.
WESTERN REGIONAL DISEASE DIGNOSTIC LABORATORY,
DISEASE INVESTIGATION SECTION, BREMEN CHOWK,
AUNDH, PUNE 411067

E-Mail :dis.pune7@gmail.com
Telephone No.-020-25692135, 25691474

## दरपत्रक सूचना

जा. क्र. रोअवि/सर्वसा/आयकर दरपत्रके(2025-26)/ १२८७ /2025, दि. २३ /07/2025.

सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७ या कार्यालयासाठी सन २०२५-२६ या कालावधीत कार्यरत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे आयकर (Form No.16, 24 Q etc) व राबविण्यात येत असलेल्या वेगवेगळ्या योजनांची ऑडीटेड यु. सी. संबंधिची कामे तसेच नवीन नियमांनुसार जी. एस. टी. कपात केलेल्या देयकांबाबत TDS on GST, Suppliers TDS (Income Tax) 26Q, 16A इत्यादी करण्यासाठी स्थानिक सनदी लेखापाल (CA) यांचेकडून बंद पाकिटातून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदरील दरपत्रके ही दि.३०/०७/२०२५ रोजी कार्यालयीन वेळ संपण्यापूर्वी (वेळ- १७.४५) या कार्यालयास प्राप्त होतील अशा रितीने सादर करण्यात यावीत. सदर दरपत्रके दि.३१/०७/२०२५ रोजी सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७ यांच्या दालनात दुपारी १२:०० वाजता उघडण्यात येणार असून दरपत्रके सादर करण्याच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही, याची दरपत्रक सादर करणाऱ्यांनी कृपया नोंद घ्यावी.

**दरपत्रके सादर करावयाच्या अटी व शर्ती**

१) दरपत्रक सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७ यांचे नावेच सादर करावे.

२) दरपत्रक सादर करताना अधिकृत लेटरहेडवरच सादर करावेत.

३) दरपत्रक सिलबंद लिफाफ्यामध्ये सादर करावे. या लिफाफ्यावर दर्शनी भागात "आयकर, ऑडिटेड यु. सी. ची कामे करण्यासाठी दरपत्रके" असा उल्लेख करावा.

४) सादर करण्यात आलेले दर दि.३१/०३/२०२६ पर्यंत या कार्यालयामार्फत होणाऱ्या आर्थिक व्यवहाराबाबत कार्यवाही पूर्ण होईपर्यंतच्या कामासाठी लागू असतील असे स्पष्ट नमूद करावे.

५) प्रत्येक बाबीसाठी स्वतंत्ररित्या दर नोंदवावे.

६) दर सर्व करांसहीत असावेत. तथापि कराची रक्कम स्वतंत्र दर्शवावी.

Scanned with OKEN Scanner

७) दरपत्रके मागविण्यात आले तरी कामाबाबत आदेश द्यायचे किंवा नाही याबाबत सर्व अधिकार सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७ यांचे राहतील.

८) दरपत्रके मागविलेले असले तरी आदेश देणे बंधनकारक राहणार नाही. यासाठी आदेश द्यावेत असा पाठपुरावा करु नये अथवा दबाव आणू नये.

९) या कार्यालयात एकुण आयकर भरणा करणारे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे बाबत आयकरा बाबतची कार्यालयाशी संबंधित सर्व कामकाज तसेच या कार्यालयाकडून राबविण्यात येत असलेल्या वेगवेगळ्या योजनांची ऑडिटेड यु. सी. देणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

१०) सनदी लेखापालाने त्यांचे दरपत्रकावर जी. एस. टी क्रमांक व पॅन कार्ड नं. स्पष्ट नोंदवावा. पॅनकार्डची छायांकित प्रत दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक आहे.

११) दरपत्रका बाबतचे सर्व अधिकार सहआयुक्त पशुसंवर्धन, रोग अन्वेषण विभाग, औंध, पुणे-६७ हे राखून ठेवीत आहेत. याबाबत त्यांचे आदेश अंतिम राहतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(डॉ.जी.एम.हुलसुरे)**
**सहआयुक्त पशुसंवर्धन**
**रोग अन्वेषण विभाग,औंध,पुणे-६७**

**प्रत- प्रसिध्दीसाठी**

१) मा. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-६७ या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर.
२) सहआयुक्त पशुसंवर्धन, पशुवैद्यकिय जैव पदार्थ निर्मिती संस्था, औध,पुणे-६७, या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर.
३) कार्यालयीन नोटीस बोर्डवर.

Scanned with OKEN Scanner